म. ग्रं. सं. ठाणे.
विषय काव्य
सं. क्र. २५९८



# इंदिरा

# चित्कळा

REFBK-0025965
REFBK-0025965

संदर्भ
काव्य
२५९८
२५९६५
१२११८८
२५९८
२५९६५
काव्य १२११८८

# चित्कळा

इंदिरा

REFBK-0025965
REFBK-0025965

मौज प्रकाशन गृह

मौज प्रकाशन
३६४

पहिली आवृत्ती
मे १९८९

© १९८९, सौ० वीणा रवींद्र संत

मुखपृष्ठ
वासंती मुझुमदार

पाठीमागील छायाचित्र
यशोदा भागवत

किंमत छत्तीस रुपये

प्रकाशक
श्री० पु० भागवत
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, गिरगाव
मुंबई ४०० ००४

मुद्रक
प्र० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, गिरगाव
मुंबई ४०० ००४

# अनुक्रम


ठुमरी १
स्वप्नें उडालीं दिगंतीं २
आला वसंत वसंत ३
निळेंसावळें ४
आरासखाना ५
मी येतें तिथवर ६
अशा अपूपाची घडी ७
पालखी ८
डोळां आसवें देऊन ९
पूर्णविराम १०
'उगीच्चच हो' ११
अशा घरांत १४
सोनावळ १५
लडिवाळा १६
आला कुठूनसा वारा १८
पाळणा १९
हें कारंजें २०
टाहो २१
न कळे २२
घरचीं सगळीं २३
एखाद्याची वाट २४
पर्वकाळीं २५
ते शब्द हवेत २६
असे शब्द, असे अर्थ २७
फोन २८
एकदा कधी २९
ही मूठ ३०
कसें निभायचें ३१
गुंजेएवढी रास ३२
एक मूढपण ३३
प्रदान ३४
उंबरा ३५
कंटाळा आला आहे ३६
"चल की जाऊं या..." ३७
पाठवणी ३८
लुटूपुटीचें आभाळ ३९
आपलें ओझें ४०
वसंतऋतु जो ४१
अशी तुला पाहतांना ४३
"मीच की." ४४
केव्हा कधीचें ४५
अनाडी ४६
नवेली ४७
पानमळे ४९
घोळका ५०
शिवाराच्या बांधावरून ५२

नदीकाठीं ५३
आभाळासाठी ५४
घडी ५५
तारांगण ५६
एक लय ५७
लोहपाषाण ५८
इथे जनाई दळते ५९
किती निकट ६०
कवडसा ६१
अजून ६२
उलघाल ६३
पाउलें ६४
वडवानल ६५
गुणगुण ६६
मृगजळ ६७
ती गाज ६८
आला उतरून चांद ६९
क्षणभर जरी ७०
प्रयाग ७१
स्वानंदमयी ७२
हृद्गंधा ७३
गंधमादन ७४
प्रदक्षिणा ७५
येतो पश्चिमेचा वारा ७७
गुंडाळें ७८
प्राजक्त ७९
कसें हें सगळें ८०
रंगमंगला ८१
वृंदावन ८३
तळ्यांत...मळ्यांत ८४
उगीच...उगीच ८५
स्तूप ८६
मयसभा ८७
भुरळ्यांचा मेळावा ८९
दिपवा ९०
सुतपुतळी ९२
एका परब्रह्माचें बाळरूप ९३
देहदिंडी ९५
चित्रभावन ९६
जिव्हाळा अवशेषांचा ९७
रेखा ९८
उल्कापात ९९
सातरंगी काकण कशी १००

## ठुमरी

पाऊलें कुणाची अरळ अरळ रेतींत?
केशरी स्वरांची ठुमरी लहरत जात!
प्रियतमा योगिनी नाम जपत की गेली,
एकेक सांडली येथे रतनअबोली!
पारुलें व्रताचीं, ओळ सेतुची रचली,
त्यावरुन सती की जोहारास्तव्र गेली.

मी रतनअबोली पारुल ठुमरी होतें,
मी त्याच खुणांवर पाउल ठेवुन निघतें;
त्या तिथे झळाळे दिव्य केशरी पूल,
हा अळिता-मेंदी मला तिथे नेईल.

## स्वप्नें उडालीं दिगंतीं

केव्हा कधी केलें प्रेम, खेळ स्वप्नांचा मांडला,
खेळ मांडता मांडता जीव दोघांचा रंगला....
तुझें माझें स्वप्न एक, सुखदु:ख तेंही एक,
तुझ्या माझ्या जिव्हाळ्याचा चांदण्याचा अभिषेक....

माझ्या चांदण्या संसारीं जोडपाउलें टाकिलीं,
दिनरात त्याच्यासाठी दोन्ही मिळून कष्टलीं;
आपुलाले व्यापताप घरीं, बाहेर वाढले,
झाला संसार जंजाळ, पाय गुंतत चालले.

उत्सुक ना डोळाभेट, बोलणेंही ना अप्रूप,
चहा, जेवण, विश्रांती—आलें गणिताचें रूप;
केव्हा केव्हा मुलांसाठी ओल्या चर्चेचा दिलासा,
त्यांच्या शाळा नि आजार—पुन्हा पहिलाच वसा.

मांडलेल्या खेळांतील स्वप्नें उडालीं दिगंतीं,
उजाडशा उन्हाळयांत पाय पोळत राहती.

क्र. क्र. ......
शाखा (स्थळ प्रत)

## आला वसंत वसंत

असा कसा हा उन्हाळा! वाळू गगनीं तापली,
पाखडत्या अंगारांत धरा सोशीक पोळली.

असा कसा हा उन्हाळा! शिवाराची झाली जाळी,
डोंगरही खाती धूळ, रानें वनवासी झालीं.

सोसतांही सोसवेना, धरा सैरभैर झाली,
स्मृती कोवळ्या उन्हाच्या....तिने ओंजळ भरली.

फुलें सोनेरी उन्हाचीं : त्यांत श्रीमुख वाकलें,
पापणीचें दहिवर फुलावरती निवालें.

कुणी माखलें चंदन? हिना कोठून दर्वळे?
आला वसंत वसंत....चोच कोवळी उमले.

## निळेंसावळें

निळेंसावळें आभाळ भरून ओथंबून
तसे माझे शब्द....घनगर्द
ओठांवर येतां येतां पांढरेभक्क झाले,
हलक्या हलक्या कवड्या झाले,
खुळखुळ वाजायला लागले,
पांढरेशुभ्र बगळे होऊन ओठांवरून उडून गेले....
तेव्हा
मीच मनाचे ओठ घट्ट मिटून टाकले क्षितिजासारखे.

# आरासखाना

वर्षाव पावसाचा. उन्हाच्या झळांचा.
थंडीच्या काट्याचा.
वर्षाव गारांचा. धुळीचा. वादळाचा.
धुक्याच्या धुराचा.
असे वर्षाव माझ्यावर....कसे एकटीवर....

मी मग्न त्यांच्या मापणींत. आलेख रेखीत.
किती-कितींत. सेंटी-मिलींत.
सीलबंद बाटल्या भरीत. त्या
आरासखान्यांत हारीने लावीत.

शेवटी एकदा माझ्याकडे बघून तो
आरासखाना मला दात विचकून हसला!
सगळा ओहळ समुद्रापार पोचला....

# मी येतें तिथवर

तुज भेटायास्तव पाउलचाल निघालें,
अभिसारिकाच की तपस्विनी, ना कळलें.
वादळी धुळींतुन रिघतां कणभर उरलें,
त्या धुक्याउन्हांतुन मंजफूल दमलेलें,
त्या ढगाढगांतुन घननिळ हिमकण झालें,
त्या निळ्या विजांतुन थेंब विजेचा घळलें.

त्या क्षितिजापाशी वाट पाहसी माझी
हातांत घेउनी फुलें केशरी ताजीं;
मी येतें तिथवर आणि हरवुनी जातें,
मी संध्यातारा....तिथेच खिळुनी असतें.

## अशी अप्रूपाची घडी

व्यथा, वेदना, चिंतेचें दुःख जळालें जळालें,
पसरल्या राखेचेंच एक महावस्त्र झालें;
लाल पाकळी जाईची तसा रंग अलवार,
गंध त्याला गाभाऱ्याचा....धूप, तुळशी, कापूर.
स्वप्न पडावें फुलाला तसें आरस्पानी पोत,
घडी घालाया हवेत मऊ, जनाईचे हात.

नाही उरलें तें दुःख, नुरलें त्या माझेंपण,
बघून त्या लावण्याला माझे मिटले लोचन
अशी अप्रूपाची घडी काळजाच्या बासनांत,
तिच्यामुळे तनमन श्रावणींचा पारिजात.
अशी वसंती उन्हांत घडी त्याची उलगावी,
वनवासी कुंतीसाठी पायघडी मीं घालावी.

# पालखी

उतरला मनावर निळा गर्दसा अंधार,
आला तरंगत वर चंद्र पिवळा मधुर.

आला भराभरा वारा, आला मेघांचा पिसारा,
आलें घेऊन पालखी....चंद्र निघाला झरारा.

काळ्या झालरीमधून चंद्र पाहतो वाकून,
माझें बाळभोळें मन धावे मागून मागून.

किती धावलें तरीही नाही पालखी थांबली,
नाही पुन्हा तशी रात मनावर उतरली.

# डोळां आसवें देऊन

डोळां आसवें देऊन तापलेल्या शांतवावें,
व्यथा ऐकून कुणाच्या ओझें मोकळें करावें,
पंख तुटल्या मनाला द्यावा आधार मायेने,
कोसळत्या सावरावें, चालवावेंही हातानें,
शिणलेल्या पावलांना चालतांना साथ द्यावी,
त्याची जडभारी वाट, वाट हलकी करावी....

माझें अजाणसें मन असें काहीसें योजितें,
दु:ख झेलायाला पुढे पदर मी पसरतें.
पदर हो चिंध्या चिंध्या, मीही होतें चूर चूर;
लुटूपुटीचा हा खेळ, दु:ख उल्कांचे डोंगर.

# पूर्णविराम

अलीकडे अलीकडे असें होतें :
आकाशवाणीवरील वार्ता
कुणाच्या जीवनाचा पूर्णविराम देऊन थांबते.
पूर्णविराम.
आदरणीयांचा, स्नेह्यांचा, जिवलगांचा, कुणाकुणाचा.
मनाची वीज बंद पडते.
सगळ्या भूतकाळाचा हुंदका एक आवंढा गिळून टाकतो.

उगीचच आठवते लग्नांतील जेवणावळ....
पानावरून उठून जाणारीं माणसें, आणि
हें संपव, तें संपव करीत रेंगाळणारी मी....
तसेंच हें कांही....
भान येतें तेव्हा मी राहुलदेवच्या स्वरकल्लोळांत
मला झोकून दिलेलें असतें.

## 'उगीचच हो'

ते तिथे उभे. सदासतेज वृक्षासारखे
सर्वाधार.
ती इथे.
दालनादालनांतून तिची लगबग
मालकिणीच्या पावलांची,
कमरेला किल्ल्यांचा घोस झोले घेणारा,
पदराचा फलकारा वळसे घालणारा.

मोठ्या घराचा तोल सांभाळणारे नोकर,
चाकर, महाराज....सर्व कांही. पण प्रत्येक कामांत
तिची म्हणून एक वेगळीच चतुराई. घरादाराला
पंखाखाली घेण्याची तिची एक अपूर्वाई.

त्या सर्व गलबल्यांतून वाट काढीत ती
त्यांच्यापर्यंत पोचतांना
दवओल्या फुलासारखी टवटवीत असते.
कमरेच्या किल्ल्या उशाखाली फेकतांना चेहऱ्यावर
राणीपण झळाळतें. तिच्या खांद्यावर
त्यांच्या हाताचा दाब. कौतुकाचा. अभिमानाचा.

ते तिथे. आरामखुर्चीत. थकलेले.
पायाशी त्यांची डाल्मेशियन मथुरी.
हातांत 'टाइम्स'चीं पानें ओघळणारीं.
भोवताली अलिप्त गलबला
कर्तबगार मुलांचा, सुनांचा, नोकराचाकरांचा....

ती तशी रिकामी. इथे तिथे. घरभर. उगीच.
तिच्यापर्यंत कांही पोचतच नसतें. कुणी बोलायचें
तर तिलाच प्रश्न व्हावें लागतें.
रडत येणारें मूलही तत्परतेने उचलून नेलें जातें.
तिच्या सूचना डावलण्यांतील आदबशीर चतुराई,
तिने अधिकाराने भरलेल्या होकार-नकारांच्या
प्रतिक्रियांची दालनादालनांतून
दिसून येणारी नवलाई,
मुरडलेल्या नाकांची, उडवलेल्या मानांची,
बुरख्यांतील बोलण्यांची....

हें सर्व रहदारीच्या चौकांतील वाहनांसारखें
तिच्या अंगाला लगटून जातें....जातच असतें.
सगळ्या दालनांचेच चौक होतात.

त्यांतून वाट काढीत ती
मोठ्या आकांताने त्यांच्यापर्यंत जाऊन पोचते.
थकलेलें मन पलंगावर लोटतें,
सगळें कोंडून पापणीशीं येतें....

त्यांच्या हाताचा तिच्या कपाळावर दाब.
समजून घेतलेला. एका सूक्ष्म कंपाचा.
तिचें मन कणवेने ओतप्रोत भरून येतें,
त्यांच्या हातावर आपला चंदनी हात
दाबून ती पुसटशी हसते....
'उगीचच हो.'

# अशा घरांत

दारांना कवाडें नाहीत, खिडक्यांना दारें नाहीत,
उघडेंनागडें सताड घर, सामानसुमान कांही नाही.
मुंगी नाही, डास नाही, कोपऱ्यांत कोळी तोही नाही.
केवळ भिंती, भुई, छप्पर—त्यांवर कांही खूण नाही.
अशा घरांत जाऊं कशी? राहूं कशी? वागूं कशी?
हसूं कशी? बोलूं कशी? घर ह्याला म्हणूं कशी?
घरभर पावलें—फीर फीर फिरलें, दारांत येऊन उभी राहिलें.
समोर कोणी—त्याला पुसलें, "हें घर इथे असलें रे कसलें?"
त्याने तर ओठावर बोटच ठेवलें, "तुझेंच घर. नाही ओळखलें?"
मुकीच झालें. घरभर पाहिलें.
श्वासांचा आवाज. आवाजाचीं पावलें.
घामाघूम....दाराशीं आलें, प्राण तोडून पळत सुटलें.
सुटलें कसली? घरांतच बसलें.
घरासारखीच रिकामी झालें.

## सोनावळ

मधुर नादती निनाद कानांत....
सतार, संतूर वाढत्या लयींत.
नादब्रह्माने की दार उघडलें,
प्राणाला भिडलें नादांचें बिंदुलें.

कशाचा चालला आनंदसोहळा?
घंटिकांच्या माळा बांधल्या आभाळा,
हेलावला वारा, नाद घेई झोला,
तारांगण झाला जीव हा इवला.

शामसुंदराचें गोधन वेल्हाळ,
माझिया शिवारीं त्याची पायधूळ.
गळ्यांत घुंगूर अमृतमंजूळ,
बांधाला तान्हेली मी ती सोनावळ.

## लडिवाळा

लडिवाळा, तुझी चाहूल लागली आणि
निळ्याशार तलावांत कमळें डोलायला लागलीं....
अवघी मोहरून गेलें !

जेव्हा तुझें मीपण तुला गवसलें तेव्हा
वेगळेपणासाठी तूं पाखरासारखा फडफडलास....
केवढा चमत्कार वाटला !
तुलामला जोडणारा धागा तोडून तुला वेगळें केलें,
पण पुन्हा माझ्याच कुशीला चिकटलास....
त्यानेच किती भरून पावलें !

मग मांडीवरून सरकलास, रांगलास,
ओचेपदर धरून बावरलास, बिदीवर धावलास
तेव्हा केवढें कौतुक वाटलें !
दूर जाता जाता पतंगासारखा नादावलास,
पण मुरडलास, ओढीने परतलास
तेव्हा अभिमानाने किती फुलून आलें !

शेवटीं तुलाही नकळत तुझ्या आभाळांत शिरलास,
असीमावर लोभावलास

तेव्हाच उमजून आलें :
काळजाभोवती वेढे देऊन राहणारा
हा रेशीमगोफ 'त्या' वेळच्याच सहजपणें
तोडून टाकायला हवा होता....

## आला कुठूनसा वारा

आला कुठूनसा वारा,
सवें सावळा आनंद;
आनंदाच्या शिंपणांत
पानडीचा ओला गंध.

बाभळीचे हळदिवे
झोत गंधाचे झेलती;
फांद्यांमधील चंद्राला
रंग पिवळा माखती.

असा माखलेला चंद्र
माझ्या खिडकीशीं आला;
डोळां चांदणें वधून
उटी विसरून गेला.

## पाळणा

गजबजलेल्या जत्रेंतील संसारचक्राच्या
जगड्व्याळ पाळण्यांतून नुकतीच खालीं उतरलें,
निरनिराळ्या बंधांनी जखडलेलें शरीर, मन
मोकळें झालें.
पावलांभोवतीच्या लक्ष्मणरेषांचीं इंद्रधनुष्यें झालीं.
पावलांत झुळझुळणाऱ्या झऱ्याची गती भरली.
सगळें कसें
उन्हासारखें मुक्त आणि पावसासारखें प्रेमळ झालें.

आता थोडें आनंदावें....खोल आभाळांत पाखरासारखें
स्वच्छंदावें....
मनाने पंख पसरले;
शरीराने नाकारलें :
निमूटपणें एका पाळण्यांतून दुसऱ्या पाळण्याच्या
अंधारकोषांत शिरलें एखाद्या गुलामासारखी.

## हें कारंजें

एकाएकी उसळणारें हें कारंजें
हिऱ्याच्या तुषारांचें, ऐऱ्याच्या थेंबांचें,
चांदण्यांच्या सरांचें....
काळजांतील खजिन्याचें.

याचें रूप डोळ्यांत रंगलें,
याच्या मंद्र स्वरांची धून कानांत झिरपली,
याच्या अमृतकणांचा गारवा ओठांवर भिनला,
याचा उल्हास रक्तांतून झुळझुळला.

हें कारंजें
कसें आकाशासारखें, काळोखासारखें ...
दिसून न असणारें, असून न दिसणारें.

## टाहो

पांढऱ्याशुभ्र ढगांचे दाट धुक्यासारखे
नाजूक गेंद
स्तब्ध निळ्या आकाशावर विखुरलेच विखुरले
की थव्याथव्याने
पांढरे मोर नाचत झुलत आले
की आजवरच्या मलमली आठवांचे थवे
उत्सवाला आले....
त्यांना पाहून
इथे
कासावीस झाला
पाय बांधलेला पांढरा मोर—टाहो फोडूं लागला.

## न कळे

इथे मी किनाऱ्यावर.
पुढ्यांत त्या डोळ्यांचा अथांग महासागर.
क्षणांत भरतीचें उधाण,
क्षणांत ओहोटीचे अंतर्मुख ताण,
क्षणांत आक्षितिज खोल सुनसान,
क्षणांत रंगगंधारांचें झिमझिम गंधर्वगान....
इथे मी किनाऱ्यावर.
तार-खर्जांतून उमळणारा विलोल कल्लोळ तिथे समोर.
न कळे कशी पायांखालची वाळू घसरली,
न कळे कशी लहरीलहरींवरून फूलमाळ तरंगत गेली....

# घरचीं सगळीं

घरचीं सगळीं कुठे बाहेर गेलीं
लाडक्या डॅशूंड झिनीसकट.
मग सावकाश जाऊन फाटक बंद केलें.
पुढचें, मागचें, कोठींचें, स्वयंपाकघराचें,
या नि त्या खोलीचें—सारीं दारें बंद केलीं.
बंद खिडक्यांवर पडदे गडद ओढले.
फोनवरची बोलकी ढलपी अडणीवरून उतरून ठेवली
आणि माझ्या खोलींत आलें.
खोली दारबंद, पडदेबंद केली नि झुलत्या
खुर्चींत निवांत झोकून दिलें....
मधुकोषाच्या त्या रसाळ तळाशीं
हात, पाय, डोळे मिटून शिंपली झालें.

केव्हापासून घण् घण् करणाऱ्या दारघंटीने
जेव्हा भान आणलें, तेव्हा
जिन्याचा रस्ता सापडेनासा झाला.

# एखाद्याची वाट

ज्याची त्याची वाट....
कुणाची कशी, कुणाची कशी,
एखाद्याची मात्र अशी तशी.

तापलेल्या आभाळाची नि उसळणाऱ्या धुळीची.
बेफाम ट्रकांची. अडमडणाऱ्या खटाऱ्यांची.
घाई-घुसमटीची. गजबज-गर्दीची.
पावलापुरती वाट काढण्याची. सांभाळत चालण्याची.

या वाटेवर नसतात आरामाचीं ठिकाणें,
नसतात स्वल्प-अर्ध-विरामांचीं चिन्हें दमछाकीसाठी,
नसतात पूर्णविराम विसाव्यासाठी,
नसतात क्षणांचीं उद्गारचिन्हें
आणि अनंताचीं प्रश्नचिन्हें.

असतें फक्त चालणें. एका पावलापुढे दुसरें पाऊल टाकणें,
उचललेलें पाऊल टेकलेल्या पावलाशीं
कधी....कधीही न टेकणें.

## पर्वकाळीं

कधी कोणत्या वेळीं, पर्वकाळीं
कांकणांना मौनाची शपथ घातली
आणि डोहाच्या काठाशीं आलें. स्तब्ध झालें.

डोहांत उतरलेल्या चांदण्यांच्या थव्यावर
मनोमनींचे बहर उधळले,
धीरगंभीर भोवऱ्यांत डोळ्यांचे दिवे सोडले,
अर्घ्य देण्यासाठी भयचकित पाऊल
काठाशींच ढगावर टाकलें....

अजूनही अंगावर अद्भुताचीं फुलें उमलतात,
केसांतून चांदण्या ठिबकतात,
मिटलेल्या डोळ्यांत तीर्थाचे तरंग
किनाऱ्याशीं खेळतात....कधी पर्वकाळीं.

## ते शब्द हवेत

ते शब्द हवेत
अथांग काळजाच्या गाभाऱ्यांतून उमटणारे,
लामणाच्या अलवार झिरिमिरीने मनोमन
उजळून टाकणारे,
गंधगारव्याने लिंपून अवघें जीवन
एक पूजेचें तबक करणारे
ते शब्द हवेत.
त्यांच्यासाठी शब्दाशब्दांचे बाजार धुंडाळले,
भूतकाळाचें वाळवंट तुडवलें,
साहित्याच्या दऱ्याखोऱ्यांतून हिंडलें,
अध्यात्माच्या धुक्यांतून वेध घेतले....
आता मन थकलें....
तरी त्या मानससरोवराची मंद्र गाज
त्या निरंजनांना निरंतर हाकारते आहे,
त्यांच्यापर्यंत पोहोचू बघते आहे.

## असे शब्द, असे अर्थ

२५९०७
२५९६५
काव्य

असे शब्द, असे अर्थ....
  मेघ उदार वाहती,
माझ्या धूळ-पाचोळ्याला
  कस्तुरीचें दान देती.

अशा शब्दांचें चंदन
  कशी भाळावरी लावूं ?
चकमकीचें मी फूल
  कशी चांदणीशी होऊं ?

असे शब्द, असे अर्थ....
  निळें आकाश मंथर,
माझ्या दीपकळीसाठी
  व्हावें शेल्याची पाखर.

## फोन

हा फोन अचानक रोरावत घन आला,
उमळल्या त्यांतुनी विद्युन्माला....माला;
मी लेणीं त्यांचीं अंगांगावर ल्यालें,
त्या जन्मांतरिंच्या लेण्यांनी गजबजलें.
हें उधाण आता कुठे बाइ लपवावें ?
सखि वसुंधरेच्या कुशींत काय शिरावें ?
ती गुपित ऐकुनी हर्षभरित होईल,
शेल्यांत फुलांच्या नीट जपुन ठेवील.

# एकदा कधी

एकदा कधी घाईघाईंतच आला
निघून जाण्यासाठी,
निःशब्द बोलण्यासाठी.
डोळ्यांत, हातीं गुंतलेल्या हातांत सगळें कांही
धगधगत होतें....
एकदम उठला.
बशींतील द्राक्षें उधळून निघून गेला.
मी तिथेंच, द्राक्षांच्या बागेंत
अंगुरांच्या झुंबराखाली, तशीच....
निःशब्द.

# ही मूठ

कधी कधी व्यवहाराच्या खेळींत
कवड्यांचें दान उलटें पडतें.
जिव्हाळा करपून जातो,
नातीं तुटून जातात,
अपमान-उपहासाच्या झोतांत
मनोमनीं सोलून निघतें.

तरी पण हसमुख राहतें. कोळ्याच्या
चिवट जिवटपणें धागे जोडायला बघतें.
हवें ना कुणीतरी—काका, मामा, मावशी
लहानग्यांसाठी
जेव्हा ही मूठ होईल अपेशी....नाहीशी

# कसें निभायचें

केंव्हाही, कुठेही, कळत-नकळत,
सकारण, अकारण डोळ्यांवर घनदाट ढग
उतरायला लागतात, पापणीच्या क्षितिजाशीं
टेकतात....दाटतात

तसें सगळें अस्तित्व कसें भीतीने थरथरून उठतें !
आता तें तुफान, त्या धारा
यांना कसें पेलायचें? कसें आवरायचें?
सर्वांपासून हें संकट कसें लपवायचें?
धरणालाच असा तडा गेला तर
कसें निभायचें?

# गुंजेएवढी रास

तळहाताच्या लालसर पाकळींवर
ही गुंजेएवढी रास, पिवळीजर्द,
सुरंगीच्या परागाची—वळेसरांतून ओघळलेली,
गोळा केलेली.
तिच्या सुगंधशिंपणीची धुंद मनभर उतूं गेलेली.
तिला जपून ठेवायला हवी—पंचमहाभूतांपासून
आणि त्याहीपेक्षा माझ्यापासून.

## एक मूढपण

हें कसलें राहणें! चार भिंतींत बंदिस्त.
पोटापुरत्या शिध्यांत गुंता झालेलें.
तवा, थाळी, तपेल्याला खरकट्यासारखें
चिपकून राहिलेलें.
उरल्या वेळीं बिनतक्रार काळोख पिंजत बसलेलें.
एक मूढपण. लाडावून ठेवलेलें. सुरक्षित. सुखवस्तू.

वाटतें : त्याने उंच आभाळात सूर मारावे.
फडफडावें. तडफडावें.
नखांना, चोचीला तडे जावे....
तीरासारखें कोलमडावें.

विसरूनच जातें,
की कोवळेपणींच त्याच्यांत
मी पोलिओ भिनवून ठेवला आहे.

# प्रदान

हवें आणि नको, आहे आणि नाही
यांचें
अदृष्टाकडूनच प्रदान होणार असेल
तर त्यासाठी
जें सोसलें त्याला हिशेब नाही, अर्थ नाही;
आणि स्वीकारासाठी
मौनाचा गडद पदर पसरणें यालाही पर्याय नाही.

हें एकदा उमजलें,
डबडबलेले डोळे एकदम आल्हादशीतळ झाले.
कोंडून आटून जाणाऱ्या मनाचा
झुळझुळ झरा झाला. तेवढ्यापुरतें मग
माझें असणेंच संपून गेलें.

## उंबरा

उतरून आली रात्र
दिवा ठेवी उंबऱ्याशीं,
जरतारी पायघडी
येणाराच्या पावलाशीं.

येतो मिस्कीलसा वारा,
टाकी मालवून ज्योत;
चांदण्याचे पाय ज्याचे
त्याला कासया हा झोत ?

दवें न्हाणिला उंबरा,
वर रेखिली रांगोळी,
कुंकू-हळदीचीं तशीं
बोटें लाविलीं कोवळीं.

आला मिस्कील किरण
वर शिंपतो गुलाल....
जडभारी जाते पाय
पंख रंगीत होतील.

# कंटाळा आला आहे

कंटाळा आला आहे....मुलांचा. त्यांच्या
खाण्यापिण्याचा, हट्टांचा. त्यांच्या दंग्याधुडगुसाचा.
त्यांची चाहूल लागते आणि काळीज
धाडधाड त्यांच्यापासून पळू बघतें—जिन्यासारखेंच.

कंटाळा आला आहे....ह्यांचा. ह्यांच्या
बोलण्याचालण्याचा, सवयीलकबींचा. एकूण तपशिलांचा.
ह्यांच्या वाऱ्याचाही. त्याच्या इशाऱ्यानेच
माझें बर्फ होऊन जातें—न वितळणारें.

कंटाळा आला आहे....घराचा. सजलेल्या
दालनांचा, टीपदार देखरेखीचा, चविष्ट रसोईचा.
वस्तूवस्तूचाच.
सगळें कांही अस्ताव्यस्त—आणि अजगराने
गिळल्यासारखी मी शून्यग्रस्त.

तरी पडदा पडतो आहे, वर जातो आहे,
सर्व कांही ठाकठीक आहे.

## "चल की जाऊं या...."

"चल की जाऊं या...."
हातापदराला ओढत त्याची भुणभूण
सारखी चालली आहे.
त्याला गोंजारत, चिमटत, दूर करत मी
"थांव, थांब की." करतें आहें.

खिडकीच्या चौकटींतील हीं निसर्गचित्रें
नव्यासारखीं कितीदा निरखून पाहायचीं?
तिपाईवरून मांडलेले कुणाकुणाच्या संसारांचे
रंगीत चित्रबंध पुन्हापुन्हा किती बघायचे?
हे आसनावरील गप्पागुच्छ—त्यांचा आस्वाद
घेत किती ठिकाणीं थांबायचें, थबकायचें?

मन किती किती विटतें; पण इथेच थांबतें.
त्याची भुणभूण कमी होत नाही.
दाराच्या चंद्रशिलेची नितळ नक्षी
पाऊल कांही ओलांडीत नाही.

## पाठवणी

लाल मातीने 'असण्यां'तील आस दिली, हौस दिली;
दऱ्याडोंगरांनी धुक्यांत बांधलेलीं स्वप्नें दिलीं;
सागराने उमळत्या लहरींची रेशिमजाळी दिली;
वृक्षवेलींनी लावण्याची आरास दिली;
पशुपक्ष्यांनी वात्सल्याची, मायेची उटी दिली;
आकाशाने प्रीतीची अथांग ओढ दिली;
अवकाशाने चंद्र-चांदण्यांची ओटी दिली;
अशी सालंकृत पाठवणी केली.

उल्हासाच्या पाचसात पावलांतच ढगांच्या भूमीतून वाट गेली.

## लुटूपुटीचें आभाळ

जेव्हा भिंती बोलेनाशा होतात,
खिडक्या-दारें स्वतःला गूढ धुक्यांत लपेटून घेतात,
भीमसेनच्या षड्जाचा ओंकार वेशींतून पाठमोरा होतो,
पावलांच्या स्पर्शाने धरणीदेखील सर्रकन
आकसून घेते,
तेव्हा
हें निळें छत, माझें हें लुटूपुटीचें आभाळ मात्र
तशीच पाखर घालून असतें.
पंख्याच्या हातांनी गार वाळ्याचे वळेसर
माझ्यापर्यंत जिवाभावाने पोचवतें.
सर्वांगावर मायेचा गारवा पसरतें....

## आपलें ओझें

आपलें ओझें आपणच वाहायचें असतें.
आपलें दु:ख आपणच सोसायचें असतें.
आपली वाट आपणच हेरायची असते.
आपलीं पावलें आपणच चालायची असतात.
शेवटीं शेवटीं ओझ्याचा बधिर क्रूस होतो.

## वसंतऋतु जो

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५९५
काव्य २५९६५
२५४५८
शाखा (स्थळ प्रत)

वसंतऋतु जो तुमचा येतो
तो तर माझा कधीच नसतो.

माझ्या मनच्या अंब्यावरुनी
कोकिळराणा पंचम गातो
तेव्हा माझा वसंत येतो,
घडीघडींतुन उलगत जातो.

हिरवी कांदापात कोवळी,
रानफुलवरा पदरावरती,
कौतुक त्याचें या साडीचें
घडीत आहे सुगंधपत्ती.

हिरवी हिरकण झळका देते,
चोळी मिळवण साडीवर की;
दंडावरती त्या स्पर्शाच्या
मोहफुलांच्या नागिणवाकी.

शुभ्र उन्हाची घडी लखनवी :
नक्षी वर, तांबूस पालवी,

थेंब केशरी, शिंपण नाजुक....
रंगपंचमी अजुन दिसावी.

निळ्या नभासम शाल उलगडे,
नवा बहावा त्यावर झुलतो;
अजून त्यांतुन वसंतवारा
माझ्याभवती गजबज करतो.

वसंतऋतु जो तुमचा येतो
तो तर माझा कधीच नसतो.

## अशी तुला पाहतांना

राणी मीराबाई तुझा माथ्यावरून पदर,
विश्वमोहनाच्या दासी तुझ्या पायांत घुंगूर,
चिपळी नि एकतारी—साज हातांत सुस्वर
वागवीसी कशाला हे साजबाज जडभारी ?
नाही का ग ओळखलें दुखावेल गिरिधारी ?

तुला तशी पाहतांना कृष्ण वारा वारा होतो,
तुझ्या आर्त आलापांना साथ बासरीची देतो,
यमुनेची तरंगाली तुझ्या पायांत बांधतो,
तुझ्यासंगें झिरीमिरी तुझा गोविंद नाचतो.

तशी तुला पाहतांना एक एक मनीं येतें :
अळुमाळ तुळशीचें रूप तुला ग साजतें.
कृष्णभक्तींत रंगली, पानापानांत सावळी
रानमधाची विराणी, लाख मंजिरी जांभळी.
तुला झुलतां पाहतां डोळां आसवें दाटलीं.

## "मीच की."

"काय ही खरेदी!"
"बघा ना!" तिने दोन्ही हातांतील पिशव्यांतील
सामान टेबलावर मोकळें करीत पदराने
कपाळाचा घाम टिपला.
"कुणाकुणाला हें?"
"बघा ना—हें यांना. हें त्यांना. हें तिला. हें हिला.
हें याला. हें त्याला. हें...."
"हें अमक्याला. हें तमक्याला.—आणि तुला?"
ती आनंदाने उचंबळली.
सर्व सामान दोन्ही भुजांनी वेढीत म्हणाली,
"हें सगळें मलाच की."
"आणि मला?"
"मीच की."

## केव्हा कधीचें

केव्हा कधीचें, जिवाभावाचें, सगळें सगळें
सुखरूप म्हणून
काळजाच्या खणांत बंदिस्त केलें. निश्चिंत झालें.
पुन्हा उघडूनही नाही पाहिलें.
कधी त्या गुलाबाच्या घड्या डोळ्यांवर
ठेवावेसें वाटलें....
पण कसें काय राहूनच गेलें.

एका अबोध रिकामेपणाने आज कासावीस होतें,
निवाऱ्याला त्या खणाकडे धावतें....
बघतें तों कप्प्यांत कांहीच नव्हतें.

## अनाडी

पावलें चालतात, पण रस्त्याचें भान असत नाही.
डोळे बघतात, पण जवळचें की दूरचें समजत नाही.
कान ऐकतात, पण बोलण्यांतील ताल, राग उमजत नाही.
बोलता येतें, पण शब्दांचें मुद्रण होत नाही.
कुठे जायचें ? कुणीं सांगितलें नाही—विचारलेंच नाही.
सोबतीला फक्त आभाळच आभाळ.
अशी ही अनाडी नि अनाडी वाटचाल.

## नवेली

गारा घेऊन पाऊस कोसळला आणि
ऊन हलकेच उतरलें.
माळावरील खळाळाचें जरीआरीचें काम बघण्यासाठी
मी खिडकीचें दार उघडलें,
तो खिडकीच्या बाहेरील कोपऱ्यांत
डोळे गुंतले. बघून थरकलें !
चौकटीला रेलून उभी इंचभराची लाल मातीची गौराई
तुषारांनी फुलून आलेली, पाकळ्यांनी बारीक सजलेली,
माथ्यावर एक लहानशी हिरकणी ल्यालेली. किती बघूं....
डोळे थकले नि खिडकी मिटून पडद्याचें टोक ओढलें.

किती पाऊस येऊन गेले. किती विजा चमकून गेल्या.
किती....
सहज थकल्या हाताचा चाळा म्हणून
खिडकीवरचा पडदा बाजूला केला.
काचेंतून जें दिसलें
त्याने आनंदाचे कल्लोळ उमळून आले.
कुणाला सांगावें, दाखवावें म्हणून
मनोमनींच्या आनंदमहालांत धावलें तो
एका खिडकीशीं पाऊलच अडलें,

विस्मयाने डोळे मोहरून आले.
इथेही तशीच, तीच, झुलणारी रोपुली.
नाजूक बांधणीची, पोपटी फांदीची,
हिरव्यागार जिरेकातर पानांच्या जुळ्या चवऱ्यांची,
माथ्याशीं नाजूक जांभळ्या फुलांच्या झुबक्याची,
सूर्यमुखी झुंबराची....एक नवेली.

## पानमळे

उशागतीं दोन जाईचीं फुलें :
चांदाला दोन सुवासाचे झुले;
अमोरसमोर मी नि सई,
नाजूक झोके, नि कोणीच नाही.

तिची ओवी, माझी ओवी
अत्तरवाऱ्यांत गाथा गोवी.
गातां गातां मंज ढळलें,
झिरमिर डोळे उमलून आले.

उशीपाशीं दोन बाळें :
साखरझोपेचे दोन पानमळे;
रेशमी हातांवर अलगद घेतले,
डोळ्यांच्या पाळण्यांत जोजवत बसलें.

## घोळका

घोळका
इथे तिथे टिपत टोकत फिरणाऱ्या,
गडद केशरपिवळ्या रंगोटीच्या,
उग्र मोठाड अशा
मैनांचा.
अंगणापरसांतून अवजड कुंचा सावरीत
तालांत पावलें टाकणाऱ्या,
रंगभांडार अशा
मोरांचा.
दूर झाडाखाली स्तब्ध उभ्या असलेल्या, विश्वनिरीक्षणमग्न
अशा विरागी
उंटांचा.

भर उन्हांत लगालगा चालताना
भिंगदार
वस्त्रांचे रंग रंग उधळणाऱ्या
नजरबंद देहातिनींचा.
राजरस्त्यावरील, दिमाखच अशा,
आपल्या थंड दगडीपणांत रसरशीत गुलाब जपणाऱ्या
शाही इमारतींचा.

त्या गुलाबी इमारतींच्या दालनांत
मनभरून
असलेल्या चित्रचौकटींतील
महाराणी आणि
सखीजनांचा....

हे घोळके ठेवण्यासाठी संदूकही तशीच अपूर्वाईची.
क्षितिजाशीं सांधलेल्या दोन अपूर्व पाकळ्यांच्या शिंपल्याची :
वरची पाकळी भक्क मोकळी.
तिची पाषाणकळा
नवरत्नांतील नीळासारखी.
खालची पाकळी रेतीमाती.
तिची रंगकळा
मृगजळाच्या ओहोटीसारखी.

# शिवाराच्या बांधावरून

शिवाराच्या बांधावरून डोळाभर बघितलेलें
तुरीचें वावर : पिवळ्याजर्द झुबक्यांनी झुलत असलेलें;
पलीकडे तिळाचें एकर : पिवळ्याधम्मक फुलांनी लखलखलेलें;
त्याही पलीकडे दूर दूर मोहरीचा पिवळा समुद्र हेलावलेला....
हा हळदपिवळा संभार—
त्या महान व्हॅन गॉगचा हा पिवळ्या सूर्याचा फलक
की त्याचेंच हें आक्षितिजसें पिवळेंगर्द मक्याचें शेत....

दचकलें....दचकलें त्या पिवळ्यांतल्या लाल रंगाला.
रक्ताच्या चिळकांडीला की ज्वाळेच्या ओढणीला
समजलें नाही.
धसका घेतलेले डोळे उघडले तों माझ्या
तीळ-तुरीच्या हळदुल्यांनी मान टाकलेली,
भुवईमधली कौतुकाची हळद मी नकळत
पुसून टाकलेली.

## नदीकाठीं

एकदा एक स्वप्न पडलें :
नदीकाठीं घरकुल बांधायला घेतलें....
आभाळांतील पत्ते शोधून आणले,
कोनांवर कोन अलगद रचले,
शेवटचा कोन रचतां रचतां
दालन दालन कोसळून आलें.

## आभाळासाठी

आभाळासाठी पाखरू हवें
पाखरासाठी झाड हवें
झाडासाठी अंगण हवें
अंगणासाठी घर हवें
घराला दोन डोळे हवे
एका डोळ्यांत आनंदाचें पाणी हवें
एका डोळ्यांत जिव्हाळ्याचे दाणे हवे
दोन्ही डोळ्यांत आभाळासकट
सगळें सगळें मावायला हवें

## घडी

ओथंबून आलेलें पावसाळी आभाळ,
घननीळ सावल्यांनी धुंदावलेला माळ,
काहूरभरला व्याकूळ वारा
मनोमनींच्या छेडतो तारा,
उलगडतें जवळची आभाळी शाल,
काठावर केवळ मनस्वी फुलमाळ....
डोळ्यांतलें सारें मानेवर टिपतें,
घडी घालून बाजूला ठेवतें.

# तारांगण

मनावरही एक वेगळेंच तारांगण असतें
चमचमणाऱ्या अगणित चांदण्यांचें,
चांदणचुऱ्याच्या आकाशगंगेचें,
कधीकधीच्या उल्कापातांचें....

त्या उल्केत लपलेलें चांदणीपण
मनाला भेटतें, बिलगतें,
आरपार झळाळतें,
तेव्हाच तर मनाला मनपण मिळतें.

## एक लय

नजर एकटक कुठे लागून राहते.
कान भवतालाची सूक्ष्म चाहूल घेत राहतात;
तनामनाच्या अवघ्या अवधानाची
धनुष्याच्या ताणांतील लय होऊन जाते.
हरवलेलें कांही गवसणार आहे ?
नवेंसें कांही समजणार आहे ?
या प्रश्नांसकट
एकूण अस्तित्वच त्या लयीच्या धारेला लागतें.

# लोहपाषाण

तुळा करतांना दुसऱ्या पारड्यांत सुवर्णमुद्राच
असाव्या लागतात
हें तेव्हाच समजलें असतें, तर घट्ट खोचलेला
कमरेचा पदर मी ऐटबाजपणें
माथ्यावरून मिरवला असता.
गळून पडणाऱ्या नाळाबरोबरच
आतडेंही गळून पडतें
हें तेव्हाच उमजलें असतें, तर तो देव्हाऱ्यांतील देव
मी प्रवाहांत लोटून दिला असता.
घनघोर एकाकीपण हेंच शेवटीं भेटीला येतें
हें तेव्हाच कळलें असतें, तर विभक्तिप्रत्ययांची
शिडी मी चढलेंच नसतें.

तिच्या धगधगत्या मनांत असा
लाव्हा उकळत असतांनाच ती विझत जाते....
लोहपाषाणाचा उजाडसा नुसता ढीग होते.

# इथे जनाई दळते

काव्य २५९८६ १६५४८

पीतांबराला लागला किती बुक्का नि गुलाल,
दळादळांत सुकली गळां तुळशीची माळ,
असें घेऊन मनांत तिच्या जीवनींचा गाभा
अनिमिष लोचनांत वाट धरूनिया उभा.

इथे जनाई दळते : शीग धान्याची सुपांत,
पहाटेच्या चांदणीची तिला एकटी सोबत.
चांदणीच्या विटेवरी उभा सावळा तिष्ठत,
एक त्याची आळवणी तिच्या ओवींत ओवींत....

जातें झरारा चाललें, कसें भिंगरीसें झालें;
पीठ शिगेवर गेलें, वर चांदणें झरलें;
तिच्या दळत्या हाताशीं गंध चंदनी दर्वळे,
तिच्या कपाळींचें दव कुणीं शेल्याने टिपलें !

## किती निकट

निळ्या-काळ्या गर्दगार पालाणावरून
शेलारी मखमालीचा चढ चढतांना
मागून
एक जिव्हाळ्याचा शब्द, काळजीचा :
"जपून...."
अधांतरीं हात—पाठीच्या पदराला
स्पर्श जाणवणारा, न जाणवणारा,
किती निकट, किती बिकट,
मनांतील अवघड स्वर मौनांत
स्फटिकासारखा वितळणारा,
कळणारा, न कळणारा....

## कवडसा

कातरवेळीं झोपाळ्यावर
तिच्यासारखीच कातर, शांत,
विरत्या रंगांत पाखराची की
भिरभिरणारी शीळ आर्त.

अवघें जीवन आरपार
मागेपुढे झुलत राहतें;
कुठे धूप, कुठे गझल
वेलांटींतून गुंफून घेतें.

आंत बाहेर जवळ दूर
कुठे कोण उजळत असतो :
कवडसा त्या उजवाडाचा
अंगांगावर खेळ मांडतो.

## अजून

पुढे जाणारा
सारखा पुढेच जात असतो,
मागे वळत नाही,
वळून बघतही नाही....

वेडेभाबडे डोळे
आक्षितिज त्याच्या पावलामागून.

उरलेलें
वेडेंभाबडें मन. चहूंकडून
परतीचीं पावलें
काळजांत धरून....अजून.

## उलघाल

दिगंतराची वेळ आली :
त्याने क्षणार्धांत हिरवे-निळे संदर्भ झटकले,
निशिगंधाचा तीर होऊन तें गोजिरवाणें
अंतराळांत झेपावलें....की मींच त्याला
हात उंचावून ओंजळींतून मोकळें केलें ?

शिखरा-सौधांची धनाढ्य नगरी ओलांडून,
भरलेल्या जलवाहिनीच्या ऐल तीरावरून,
खिल्लारांच्या हिरवाळीवरून, घनदाट अरण्यावरून,
शेवटीं धूसर पर्वतराजी ओलांडतांना तें
दिसत नाहीसें झालें.

शिणून दमून तें ओघळलें तर नसेल ?
घाबरेंघुबरें कुठे वाट तर चुकलें नसेल ?
गोफणीच्या वेधाने कुठे निखळलें तर नसेल ?
उगीचच ही मनाची दुखरी उलघाल.
त्याच्या विसाव्याच्या मनोवांछित वृक्षावर
असणारच तें शीळखुशाल.

## पाउलें

वाळवंटाचा मोतिया,
वर भर्जरी लहर;
सूर्य सुशांत पिवळा
तरंगतो काठावर.

हेंच संकेताचें स्थळ,
संकेताची हीच वेळ
आणि मनांत हा असा
मृगजळाचा कल्लोळ.

येणाराचीं फक्त आता
मला पाउलें दिसावीं,
अवघड श्वासावरी
उटी चंदनी चढावी.

## वडवानल

ओठ निरागस हसणारे,
डोळे खट्याळ चमकणारे,
गूढ मधुर लहरींचा सतत वेध घेणारी,
रसरशीत हातांनी सहज कशी गवार मोडणारी....
हें तिचें सगळें नेहमीचें.
जाणवणारें.

मनावर चढलेले बर्फाचे थरावर थर,
ओठांवरील हास्यांत थिजलेला संगमरवर,
नजरेंतील हिमगार अंगार....
हें तिचें कधी कधीच न जाणवणारें.

एकदा त्या वडवानलाने
माझा पदर भिजला,
खोल खोल काळजापर्यंत जळत भाजत गेला.

## पाउलें

वाळवंटाचा मोतिया,
वर भर्जरी लहर;
सूर्य सुशांत पिवळा
तरंगतो काठावर.

हेंच संकेताचें स्थळ,
संकेताची हीच वेळ
आणि मनांत हा असा
मृगजळाचा कल्लोळ.

येणाराचीं फक्त आता
मला पाउलें दिसावीं,
अवघड श्वासावरी
उटी चंदनी चढावी.

## वडवानल

ओठ निरागस हसणारे,
डोळे खट्याळ चमकणारे,
गूढ मधुर लहरींचा सतत वेध घेणारी,
रसरशीत हातांनी सहज कशी गवार मोडणारी....
हें तिचें सगळें नेहमीचें.
जाणवणारें.

मनावर चढलेले बर्फाचे थरावर थर,
ओठांवरील हास्यांत थिजलेला संगमरवर,
नजरेंतील हिमगार अंगार....
हें तिचें कधी कधीच न जाणवणारें.

एकदा त्या वडवानलाने
माझा पदर भिजला,
खोल खोल काळजापर्यंत जळत भाजत गेला.

## गुणगुण

काळें घनदाट मौन
आज नीरनिळें झालें,
निळ्या शुभ्र लहरींत
डुलूं लागलीं पारुलें.

निळें उमले आकाश,
फुले हिरवें लाघव,
मधे उल्हासाचा वारा,
पद्मगंधाचा उत्सव.

उत्सवाची नादवेल
कशी आली बहरून,
पानाफुलांत, उन्हांत
झंकारली गुणगुण.

## मृगजळ

मृगजळास पाहिलें,
कशि नि काय भारलें,
लवथवती किरणधार,
मृगजळांत धावलें;
उसळत्या निळ्या उन्हांत
मृगजळांत हरवलें....

पुन्हा तशीच तीच मी
मृगजळांत उमटलें;
अमर, शुभ्र कमळ की
मृगजळांत डोलले....

## ती गाज

उंच वृक्षाखालच्या रंगरेशमी पायघड्यांवरून
चालताना ओंजळींनी झेललेलीं ओलसर फुलें.
दुरून दबा धरत पावलाशीं येऊन
अंगभर सपकारणाऱ्या मिस्किल समुद्रलाटा.
जुनेर, बाळोतीं पांघरून
गौर झालेली गर्द नारळींतील मिणमिणती झोपडी.
इथे तिथे, इथून तिथून, यांतून त्यांतून ती गाज....
तिचें एक वेगळें विश्व :
त्याच्या आकाशनीलिम्यांशी रुमझुमणारा
मुग्ध तन्वीर
तणपाण्याच्या गालिच्यावर. एकाच वेळीं
फेर धरून आपापला गुलाल उधळणारा अवघा ऋतुसंहार.
त्यांतच मी
झळाळणारी. शहारणारी. भिजलेली. भांबावलेली. भारलेली.
उत्फुल्ल. त्रिकालमुक्त.

## आला उतरून चांद्

आला उतरून चांद् माझा मुराळी दाराशीं,
घोडा त्याचा खोळंबून बहरल्या चाफ्यापाशीं.

खिंकाळतो घोडा दारीं, लगबग काळजाची :
वाळूवरून माहेरीं माझी सवारी जायाची.

असे कसे निघतांना डोळे गेले ग दिपून !
उभा शेंदराचा गेंद दारीं वाट अडवून.

## क्षणभर जरी

क्षणभर जरी तूं पाहिलें असतेंस
तरी मी चिऱ्यावरून ढळलें असतें.
त्यासाठी किती सावधपणा! पण एकदा
काचबंद वेगवतींतून जातांना तुला
डोळांभर पाहिलें....
थरकलेंच थरकलें!
एक बरें होतें—तुझ्या उमळून येणाऱ्या लाटा
आवरून तूं
किती दूरवर आकाशमग्न होतास....

तुझ्यावरून येणाऱ्या त्या खाऱ्या कोमट वाऱ्याने मला
धावत्या काचेंतून ओळखलें की काय....
लाडक्या चार्लीसारखा भणाणत धावत
आत घुसला काय,
अंगाखांद्यांवर नाचानाची काय....
अशांतच त्याचे उच्छ्वास काळजापर्यंत पोचले,
भान येतें तो मी ढगावर डचमळत असलेली....

## प्रयाग

अवचित मागितलें तुझें अक्षर
माझ्या अंतर्बाह्य अगणित नेत्रांनी.
धुंडाळला पेटीचा तळ : जुने कोंबून ठेवलेले जुडगे
कुठे नव्हतेच. विजेच्या लोटाने लुटून नेलें,
प्रळयाच्या पाणलोटांत वाहून गेलें....धापच लागली.

सरत्या धापेला सापडलीं तुझीं नऊदहा अक्षरें
पुस्तकाच्या पहिल्या पानांत—माझ्या नावांत.
त्या अक्षरांच्या डोळांभर वळणावळणांतून
साकारली ती शब्दमाला :
कार्डियाक मॉनिटरमधून धावणारी स्पंदनमाला.
ती तर त्रिवेणी—
रसरसून उमळत उसळत येणारी त्रिवेणी!

शब्दार्थाची खळाळत येणारी गंगा,
भावार्थाची उतट सावळी यमुना,
, ; . ? ! .... .... अशी
धडधडत येणारी मौना....
त्या प्रयागांत मी उभी.
ओंजळभर तीच त्रिवेणी संथ आणि
तिच्यांत फक्त तुझे डोळे तीर्थस्नात.

## स्वानंदमयी

उत्तररात्रीचें तें एक स्वप्न होतें की
स्वप्नासारखें डोळाभर लहरणारें तें कृष्णनील
विश्वपाळण होतें....
ज्याच्या शोधांत आयुष्यांतील पहाड ओलांडले!
ज्याच्या ध्यासांत निष्पर्ण, निर्गंध, कठोर फांदेरी झालें!
तें प्रसन्न मनभावन सामोरें आलें :
विस्मयाने पालवलें, आनंदाने उरींओटीं उतू आलें,
एका सुगंधित समाधानांत आकंठ झालें.
कोटि कोटि नेत्रांनी
त्या अथांग शांताकाराकडे एकटक
स्वानंदमयी झालें!

## हृद्‌गंधा

कोणत्या अद्‌िम ओढीने कुणिं मला इथे पालविलें,
कोणत्या अमृतवेळेच्या अवसरांत येथे आलें ?
कमळांत अंतराळाच्या ठाकलें मजपुढे कोणी,
किति जन्मांतरिंचे हेतू नजरेंतुन आले जुळुनी.

आनंद अनावर होती, कौतुकें उधाणत येती,
तनमनीं लक्षदीपांचीं औक्षणें उजळुनी फिरती.
उदयास्त चंद्रसूर्यांचा—तें बिंब धरुनिया हातीं
कुणि लावि तिलक शकुनाचा दळ मिटल्या भाळावरती.
अम्लान फुलें सुरतरुचीं, स्वप्नांना खुडतें कोण ?
गुंफून वळेसर त्यांचा मणिबंधिं बांधतें कोण ?
हें कृष्णवसन कशियाचें, घडिमोड करितसे कोण ?
मनहारि पदर चंद्रांचा खांद्यावर झेलित कोण ?

तमश्यामल लहरीवरुनी पालाण कुणाचें येतें ?
निशिगंध सुगंधित पुतळी मी सर्वस्वाधिन होतें !
हृद्‌गंधा मी तर त्याची हृदयावर त्याच्या रुळतें,
नवज्योत जुळ्या वातींची कशि संथ लहरशी निघतें....

## गंधमादन

"हें हिरवें पित्रळें, किती गार गार मऊशार
नागवेलीचें पान...."
        "हें तर दिसतें सावळलेलें आरसपानी
तनमान—रसरसभान...."
"पानावर चुन्याची गुलाबगंध पाकळी,
तिच्यावर सुपारीची जिरेकातर राखुली,
वर केवड्यांतील काताची सुवासिक गोळी...."
        "ही तर भावुक भाजूक रूपाची,
        नैष्ठिक कणखर ठेवणीची,
        रसरंगभरी प्रीतीची गंधिल कळी...."
"वेलची, जायपत्रीचें बाजूंनी गंधागर,
सर्वांवर शेला जसा, रेशमी खोबऱ्याचा थर,
लवंगेचा फूलकाटा कसा जबर....मौनमंथर...."
        "हे तर तीव्र-कोमलांचे विभ्रमी इशारे
        लयींतून झंकारत थबकत झरणारे,
        चतुर खटमधुर कानांत गुंजणारे...."
मन कसें तळमळून उठलें,
निघालेल्या पांथस्थाला डोळांपाणी आडवले,
गंधमादन गोविंदविडे मुखीं मुठीं ठेवले
डेख, साली, कचरा मात्र—तेवढीच इथे उरलें.

## प्रदक्षिणा

कुणी पूजितें कुणाला
चित्तगंधीच्या फुलांनी,
धुंद विजेच्या परागा
गंध आगळा उन्मनी.

कुणी उतरतें पूजा
तपी चाफ्याच्या मुळांशीं,
दिसामाशीं वाढणाऱ्या
निर्माल्याच्या राशी राशी....

राशींतील चंद्रधारा
काय शोषिल्या मुळांनी?
चाफा उतत मातत
उधळला रोमरोमीं.

पानें धावलीं दिशांशीं,
तुरे पोचले आकाशीं
आणि भिडला दर्वळ
अंतराळाच्या उराशीं.

## गंधमादन

"हें हिरवें पिवळें, किती गार गार मऊशार
नागवेलीचें पान...."
"हें तर दिसतें सावळलेलें आरसपानी
तनमान—रसरसभान...."
"पानावर चुन्याची गुलाबगंध पाकळी,
तिच्यावर सुपारीची जिरेकातर रासुली,
वर केवड्यांतील काताची सुवासिक गोळी...."
"ही तर भावुक भाजूक रूपाची,
नैष्ठिक कणखर ठेवणीची,
रसरंगभरी प्रीतीची गंधिल कळी...."
"वेलची, जायपत्रीचें बाजूंनी गंधागर,
सर्वांवर शेला जसा, रेशमी खोबऱ्याचा थर,
लवंगेचा फूलकाटा कसा जबर....मौनमंथर...."
"हे तर तीव्र-कोमलांचे विभ्रमी इशारे
लयींतून झंकारत थबकत झरणारे,
चतुर खटमधुर कानांत गुंजणारे...."
मन कसें तळमळून उठलें,
निघालेल्या पांथस्थाला डोळांपाणी आडवले,
गंधमादन गोविंदविडे मुखीं मुठीं ठेवले
डेख, साली, कचरा मात्र—तेवढीच इथे उरलें.

# प्रदक्षिणा

कुणी पूजितें कुणाला
चित्तगंधीच्या फुलांनी,
धुंद विजेच्या परागा
गंध आगळा उन्मनी.

कुणी उतरतें पूजा
तपी चाफ्याच्या मुळांशीं,
दिसामाशीं वाढणाऱ्या
निर्माल्याच्या राशी राशी....

राशींतील चंद्रधारा
काय शोषिल्या मुळांनी?
चाफा उतत मातत
उधळला रोमरोमीं.

पानें धावलीं दिशांशीं,
तुरे पोचले आकाशीं
आणि भिडला दर्वळ
अंतराळाच्या उराशीं.

इथे चाफ्याच्या तळाशीं
ऊनसावलीची जाळी,
पावलांची प्रदक्षिणा
संथ उमटू लागली.

## येतो पश्चिमेचा वारा

येतो पश्चिमेचा वारा, त्याची भारांत वाहाणी,
कणाकणाला लिंपिते चैतन्याच्या धारोष्णांनी.
चोच आवसेचा कोंभ : अव्यक्ताला छेद देते,
त्याची अग्निवर्ण दृष्टी अणूरेणूला झोंबते.

येतो पश्चिमेचा वारा, अंतरिक्षीं सूर घेतो,
घननीळ त्याचे पंख, सारें आभाळ व्यापतो,
रोरावत वेग घेतो, वेग पंखांत भरतो,
अंतराळ-पाताळांचा धरणीला डोल देतो.

येतो पश्चिमेचा वारा, असा झापावत येतो,
झापाझापांनी विजेचे जळबुंद पाखडतो.
येतो पश्चिमेचा वारा, बाई झेपावत येतो,
वारा तुझ्या आठवांचा काय पक्षीरूप घेतो ?

## गुंडाळें

स्निग्ध नीलाकाशावर उमटलेल्या
मनस्वी रेषा. त्या रेषांच्या
उभ्याआडव्या नागमोडी वळणांतून घडलेलें
एक स्वयंभू गुंडाळें.
त्याच्या रेषारेषांतून घुमतात वर्षाकाळाचे
घनगंभीर मृदंग, लकाकतात
शरत्कालाचे ओले उन्हेरी रंग.
एक लोभस गुंडाळें.

गुंडाळें ? हें तर एक गहन गहन गुंताळें !
सुरगाठीचें, निरगाठीचें....
फासाचें, सरकफासाचें....रेषांचें, गतिबंद वळणांचें....
न सुटणारें, न उलगडणारें गुंताळें
एका संचिताचें.
याचें एक टोक डोळ्यांत नजरबंद झालेलें,
अदृश्य असें दुसरें टोक ओठांत कैदबंद झालेलें....

## प्राजक्त

दा. क्र.

सडा घातला अंगणीं, वर रेखिलें प्राजक्त,
उगवत्या नारायणा जोडिले मीं दोन्ही हात.

दोन्ही हातांची ओंजळ भक्तिभावें पुढे केली,
काय प्राजक्तफुलांनी शिगोशीग ओसंडली ?

कांही सुचेना, कळेना....गेलें अवघी मिटून,
आलीं फुलें हीं कोठून ? तन, मन प्रश्नचिन्ह.

मनामनाच्या पल्याड, प्रश्नचिन्हाच्या शून्यांत,
बाई, तिथे देखिलें मीं एक देखिलें अद्‌भुत.

एक कोरलेलें लेणें, एक मनस्वी प्राजक्त,
एक जुळली ओंजळ आग्रहाच्या वळणांत.

तोच काय हा प्राजक्त स्वर्णरंगी मित्र होतो,
शुभ्र, केशरी रंगांनी माझी ओंजळ भरतो.

## कसें हें सगळें

कसें हें सगळें अलग अलग होत चाललें :
अवतीभवतीच्या आप्तसुहृदांचे बंध, अनुबंध,
लाघवी प्राण्यापाखरांचे लळे आणि छंद,
आभाळाच्या अनेकानेक कळांचे ओतप्रोत जिव्हाळे,
ऋतूऋतूंच्या प्रेमवर्षावाचे उत्फुल्ल सोहाळे—
सगळें कसें अलग अलग होत चाललें....की
उलगत उलगत चाललें ?
कांही आकारतें आहे की आकार नाकारतें आहे ?
पिकल्या पिवळ्या पातींचें हें केवड्याचें कणीस
की थरथरत उलगत जाणारें हें
चंद्रधवल ब्रह्मकमळ ?
प्रभूच्या दुभंग हृदयांत शिरलेल्या मीरेच्या
पदराचा हा चोळामोळा तेजगंधी
की मोनालिसाच्या सर्वसंदर्भातीत स्मिताच्या
या सूक्ष्म थरमंथर सावल्या ?

## रंगमंगला

त्या प्रश्नाकृती दुर्बिंगीच्या डोळ्यांत बघतांना
मन कसें हरवत हरवत राहिलें.
अवकाश व्यापून आकाशांत दिसत नाहीसे झालेले
ते घनगंभीर उत्तुंग पहाड. आकाशगंगेच्या प्रपाताखाली
सुस्नात. अंगावर भस्माचे पट्टे आणि
केशरी गंधाचे फराटे चर्चिलेले.
होमहवनांतील शुभ्र लोट पाताळांतून वर चढत चढत
त्यांच्या वक्षापर्यंत पोचलेले.
त्या रंगमंथनाच्या झिरमिर काठाशी एक मंडपी,
चिमुकल्या फुलासारखी, चार खाप्यांची.
खापे—ते तर अँजेलोच्या छिन्नीने उडवलेल्या चिपांचे,
मॅडोनाच्या संगमरवराचे, चांदणवाणाचे.
मंडपींत समोर एक वेदिकापुष्प
सोनपिवळ्या लालस पाकळ्यांचें.
त्याच्या पलीकडे सतेज पर्णासनावर
ती आसनस्थ, ध्यानस्थ, पिवळें झळाळ वस्त्र ल्यालेली
एक रंगमंगला.
दोन्ही हातांचें संपुष्ट हृदयाशीं आडवें धरलेली;
संपुष्टांतील वालुकेवर तिची नजर स्थिरावलेली.

समोरच्या घननीळ पहाडाशीं पिवळाजर्द सूर्य
तिच्या रक्षणाला.
तिच्या अर्धोन्मीलित नेत्रांतील साकारतें शिल्प
तिच्या सोबतीला.

## वृंदावन

आभाळाला टांगलेली
शिमीटची एक खोली. चिंचोळी गॅलरी.
गॅलरींत टांगलेला
डालडाचा डबा. त्याच्यांत तुळस
रोंगी रोंगी, फिकट पानांची, नखुल्या मंजुळांची.
सोबत तिला गोठलेल्या नारळीची.
वर वळचणीला गिरक्यांचीं पारवळें,
पारवळांची घुटूरघूम....
शेजारीच ती चाफेचिऱ्याची, रंगभऱ्या चुड्याची.
सतत सतत मनांत घुमवत
हिरवा पिंपळ, काळें शिवार, जांभळा मळा....
छन्‌छन्‌ पावलें पांदींतून ठुमकलीं,
ठक्‌ ठण्‌ ठक्‌ ठण्‌ जिनाघाटी उतरलीं.
पायांत वाळूची गजबजपट्टी. पुढे तर
उधाणता वर्दळदर्या. दर्याची गाज.
केवढा पसरलेला, फेसाळलेला एक
गरगर भोवरा.
भोवऱ्याची थरकाप पायांतून फिरली,
धावत धावत घाटीवर चढली;
धापा टाकत तिने माहेरच्या त्या
वृंदावनाला घट्ट मिठी घातली.

## तळ्यांत...मळ्यांत

गौराईच्या हिरव्या-पिवळ्या चालणीचीं
गोजिरवाणीं पावलें,
त्यांची 'तळ्यांत....मळ्यांत' खेळासाठी
उठू उठू चाळवणी.
लालबुंद मेंदीला ऊन हवें,
चांदीच्या मासोळीला पाणी हवें,
घोळाच्या पाकळ्यांना वारा हवा,
रुप्याच्या साखळीला बारीक फुलांचा साज हवा,
'तळ्यांत....मळ्यांत' हवेंच हवें....
—आणि तें उठू उठू पाऊल अजाणाहून अजाण!
उचलत्या पावलाला कसलें भान!
घनघोर काळोखाचा चक्रव्यूह,
स्तब्ध-निःस्तब्धाचा आतओढी भोवरा,
आरस्पानी तारांगणाचें अधांतरीं अंतराळ....
उचललें पाऊल पडणार तरी कशांत?
संवेदनाच सगळ्या गोठून जातात. एकच उरते.
एकच व्हावें :
पाऊल जिथे पडू पडू होईल तिथे,
त्याच्याखाली
तें काळीज अलगद सरकावें—कासवासारखें.

## उगीच...उगीच

"किती उन्हाची आलीस!" "उगीच."
"अशी गप्पशी...." "उगीच."
"चहा का नको?" "उगीच."
"पाणी तरी....?" "उगीच काय...."
समोर पाण्याचा ग्लास.
स्फटिकासारखीं पाणपाखरें आत डुबकलीं,
डुबकतांना काठाशीं किलबिललीं, "उगीच उगीच."
"हसायला काय झालं?" "उगीच."
"हें 'उगीच उगीच' काय चाललंय...."
पुन्हा 'उगीच' म्हणालें नाही. नाहीतर उगीच....
ग्लास उचलून ओठाला लावला तर ती
पाणपाखरें चोचीं वर करून किलबिललीं,
"उगीच....उगीच!"
पिऊं की हसूं करतां ठसका लागला.
ग्लासांतून निसटतांना एक खडीसाखरी पाणपाखरूं
किलबिललें, "उगीच....उगीच...."

## स्तूप

पावसाच्या सरी सरसरून ओसरून गेल्या,
थंडीच्या लहरी थरथरून लहरून गेल्या,
उन्हाच्या झळा झळंबून झळझळून गेल्या,
चाफ्याच्या भुंड्या फांदीवर.
ती—केव्हापासून
पोटांत घेतलेल्या पायांवर स्तब्ध बसून,
पंख, डोळे अगदी घट्ट मिटून,
एक चिमुकलासा लडिवाळ स्तूप होऊन.
अंतरींचा कैलास मौनांत बुडून गेला आहे
की कैलासाच्या मिटल्या मोन्या पाकळ्यांत
तिने तळ गाठला आहे?

## मयसभा

प्रवास कसा—वळण आणि वाटांचा.
एक लहानसें वळण, पुढे वाट.
वळण कसें—चढाचें, उताराचें, पाणथळीचें,
दगडगोट्यांचें, निळ्याहिरव्या उटीची
मोहिनी ल्यालेलें, कुतूहलाने दाटलेलें,
थोडेसें भ्यालेलें, मनाच्या
उरल्यासुरल्या ताकदीने भारलेलें.
हें तर नेहमीचेंच.
पण आजचें वळण असें कसें ?
भवतालाची मोहिनी नाहीशी झालेली.
कुठली एक मयसभा उघडलेली.
वास्तूवास्तूवर चढलेला मौनाचा काचबंदी
झगमग गिलावा. पावलाखालची आकसून
घेणारी फरसबंदी अलिप्त हिरवळ.
ते वृक्ष, तीं पांखरें, ते झरे, ते वारे—
सारे मला चुकवून धावणारे. आणि
जिवलग आकाशावरचा तो उगवता केशरी गेंद
डोळ्यांतून बुडत चाललेला.
अवघा धीरच नित्राण झाला. आधाराला
पसरला तो हात पुन्हा जागेवर आला.

एकूण वळणांचे संदर्भ सुटत चालले,
मयसभेचेंही खरेंखोटें मनांतून निसटलें.
पुढची वाट हा विचारच एका शून्याचा.
संदर्भ फक्त तळहाताला लागलेल्या पुसटशा
केशरी झळाळाचा.

# भुरळ्यांचा मेळावा

ह्या कागदावरचे काळ्याभोर गोजिरवाण्या
भुरळ्यांचे मेळावे....स्थलकालाच्या
तारांच्या पिंजऱ्यांत कोंडलेले.
उडायला पाहणारे, उडताना आडणारे.
तारातारांतून नखुल्या अडकवून भिरभिरणारे,
सीत्कारणारे.
त्यांच्या पसरलेल्या पंखांखालील तारे बघून
डोळ्यांत पाणी भरलें. चुराचुरावरून मी त्यांना
अलगद उंच उधळून दिलें.
त्यांतल्या चारसहा भुरळ्या तरी तुझ्यापर्यंत
पोचल्या असतील, खांद्याच्या दांडीवरून
तुरतुरत शिळांच्या सोनतारा छेडीत असतील,
शर्टाच्या बटणावर नखें रोवून चेहऱ्यावर
लुकलुकत असतील, हातांतील घड्याळापाशी जमून
चोचीने त्या अद्भुताचा शोध घेत असतील....
त्यांना माझ्या ओठाबोटांचा वास येत असला तरी—
तरी त्यांना पिंजऱ्यात कोंडू नको.
आकाशगंगेपाशीं धुक्याच्या तणपात्यांनी
विणलेल्या आपल्या परमसुखाच्या ऊबदार
घरट्यांत त्यांना जाऊ दे....

## दिपवा

गच्च भरून आलेल्या आभाळांतील ढग
मधूनच जरा बाजूला सरून दिपवा सांडावा
तसें तुझें येणें.
खिडक्या-कौलारांतून शिंतडणाऱ्या बाहेरील
झिम्म पावसाच्या तुषारांचे सुखद शहारे
तसें तुझें असणें.
गारठलेल्या हवेंत शाली पांघरून घ्याव्या
तसें आपलें बोलणें.
जिव्हाळ्याचें. सुखदु:खाचें. अडीअडचणींचें.
कसल्या कसल्या बेतांचें. थट्टेच्या खळाळाचें.
नेहमीच्या दुखण्यांचें आणि मृत्यूचेंही....
ऊनपावसाच्या या आरस्पानी उल्हासांतून
माझ्या मनांत धरलेली एक संतत धार.
तू कोण आहेस? भाऊ, मित्र, की तो
पंढरीचा सखा सावळा....
भाऊ असशील तर निघतांना एक मुलायम घडी
मांडीवर ठेवशील;
मित्र असशील तर आभाळलेल्या डोळ्यांतील
'येतों'च्या हाताचा ठसा डाव्या खांद्यावर
उठवशील;

पंढरीचा सावळा असशील तर निघतांना तूं
हातावर ठेवलेलें तुळशीपान माझ्या घराघरांत
उजळेल....
पण मला हें उमजून येईल तोवर तूं गेलेला असशील
आणि आभाळ भक्क झालेलें असेल.
हें तर फारच चुटपुट लावणारें !

## सुतपुतळी

तबकांत पुजेच्या सुतपुतळीचा वाळा :
मनहारी वळसा मनास वेढुन गेला.
सुकुमार कपाशी, गेंद देखणे घडले,
त्या पिळापिळावर कुंकुम मंगल चढलें.
मणि उन्हाउन्हाचे, अरुण दोरणी झाला,
आनंदघनास्तव कुणीं गुंफिला शेला.
की जीवनधारा आणिक अनुभवराशी
यांचीच ववण ही अर्पित प्रभुचरणांशीं ?
माझाच काय हा वाटे मजला शेला
जळलहरीवरती उतरुन वाहुन गेला ?
उरणार काय मग पूजा जेथे घडली ?
दो बोटांवरची खूण कपाळीं जडली.

# एका परब्रह्माचें बाळरूप

हिरव्या-पिवळ्या बहराचा गच्च आशीर्वाद
लाभलेला तो प्रचंड वृक्ष
माझ्या जाण्यायेण्याच्या वाटेवरचा....
त्याच्या चांदव्यामधून माझे डोळे नेहमीच
रुमझुमत्या दिडक्या चालीने पार व्हायचे,
नेहमीच त्याच्या खालून जातांना त्याचे घोस
मंद सुगंधाने मला वेढून जायचे,
त्याचे खाली टपटपलेले हळदरंजनी तुरे
हातांत घोळवत मी घरी न्यायचे.
आज नेहमीसारखा त्याचा हिरवा चांदवा
दिसलाच नाही. पावलांत वीज भरली. बघतें तो
रात्रीच्या वादळांत तो प्रचंड वृक्षराज पुरा निखळलेला.
त्याच्या कळगीचा घनगर्द विस्तार जमिनीवर घुसमटलेला.
त्याच्या भरदार खोडाचा आधारखांब आडवा पडलेला.
त्याचा उखाडा तर मन उखडणारा....
धरित्री लपेटून घेत असतांना उखडून आलेल्या,
तुटून आलेल्या त्याच्या जाड मुळांचा केवढा गुंताळा !
त्यांना फुटलेलीं तीं लालसर स्वच्छ अशीं बाळमुळें—
मनसोक्त स्तनपान करतांना सुखावलेलीं तान्ह्या बाळाचीं
तीं लुसलुशीत बचकुलें....

नकळत तीं हातांत घेतलीं, कुरवाळलीं, ओठांशीं,
गालांशीं धरलीं, डोळ्यांना लावलीं. निरोप घेतांना
हातांतील बाळमुळ्यांना हलकेच खाली उतरवलें. त्यांच्या
कोवळ्या कोवळ्या स्पर्शसुवासांतील त्या
प्रचंड वृक्षाचें तान्हेंपण काळजाला बिलगून राहिलें.
एका परब्रह्माचें बाळरूप....

## देहदिंडी

अवध्या गाभ्यांतून
झिरमिरझिरमिरत सुसत हा निळासावळा
संथ प्रवाह कुठे निघाला आहे?
वाऱ्याच्या सावळ्या सुताबरोबर धूलिकणांनी
मांडलेला हा मौननिर्भर वाहता रास तर नव्हे?
डोळे तेवढे एकटक न्याहाळतात
बागडत्या कोकरांच्या खुरांच्या आजूबाजूला उमटलेल्या
कोवळ्या खळगुल्या, त्यांतून
त्यांना राखणाऱ्या बाळडोळ्यांतील ओसंडणाऱ्या
मायेचे ओतप्रोत अणुरेणू त्यांच्या
सोबत चाललेले.
त्या प्रभूला भेटण्यासाठी निघालेली ही
देहदिंडी तर नव्हे!

## चित्रभावन

आक्षितिज हेलावत उसळत राहणारी,
फुलत्या मिटत्या असंख्य मुद्रामुद्रांतून बहरलेला
नाजूक फेनफुलोरा आकाशावर उधळणारी चांदणकळी
अपरंपार जळराशी.
शामधूसर नभोवितानांत संथ लहरणारा,
कलाकलांनी उत्फुल्ल होणारा, मिटणारा मनोमनींचा
चंदेरी उल्हास, अगणित करांनी धरेवर बरसणारा
कांतिमान शांताकार.
कितीदा....कितीदा ही आदिम सौहार्दाची कृष्णचंद्रिका
डोळांभर पाहिली, मनोमनीं साठवली—ओसंडून आली.
त्या लहरीवरून तरंगत आलेल्या पिंपळपानावरचे
ते चित्रभास....
नीलकांत जरतारी शेला पांघरलेली, फुलोऱ्याच्या
मोतीचुराची ही उत्तुंग तेजस रास!
जन्मोजन्मींच्या अधांतरावरून चढत्या-वाढत्या
सौहार्दवेलीवरचा हा नभसन्मुख महारूपी कळा!
की समोरच्या तसबिरींतील केवळ अप्रत्यक्ष पाहिलेल्या
हिमनगाच्या या झळकत्या लहरत्या
निरंजन भावकळा....

## जिव्हाळा अवशेषांचा

राखाडी ल्यालेल्या जोगिणीसारख्या ठेंगण्या टेकडीवर
एक राऊळ : एक ओबडधोबड पडझड
तपाला बसलेली.
दीपमाळेचा आकार जमिनींत आडवा रुतलेला.
पायऱ्या निखळलेल्या. सभामंडपाच्या भिंती कोसळलेल्या.
अवतीभवती सभोवार दगडमातीचे उद्ध्वस्त अवशेष
असहाय पसरलेले, वाट पाहणारे.
मंडपाचे उभे निराधार खांब आकाशाला गाऱ्हाणें घालणारे.
गाभाऱ्याचें दालन घनदाट कृष्णमेघांनी दाटलेलें. भारलेलें.
त्या मेघबंदींत कडाडत सपकारणाऱ्या अंगाररेखा
पलीकडचें आमंत्रण गरजणाऱ्या.
फरसबंदीच्या पसाऱ्यांत एकेकाळच्या वस्तीच्या खुणा:
तीन दगड जुळवून मांडलेले. कलंडलेले. वाळवीचे
थरावर थर बसलेलीं चार लाकडें.
मातींत घोळलेली लाल लुगड्याची एक चिंधी आणि
दगडाच्या फटींतून दिसणारा एक बांगडीचा तुकडा.
मेघमंडळाने 'ये ये' म्हणून फेकलेले मंतरलेले दोरे
आणि भूतकाळांतून उपळून आलेला अवशेषांचा जिव्हाळा....
सभामंडपाच्या गूढ भिंतीच्या ढासळाला टेकून मी उभी.

## रेखा

एक एक चोच का ही अशी चालली मिटून ?
एक एक झंकार का असा जातो मावळून ?
स्वरावली होत गेली रुखी आणि मुकी मुकी,
डोलणाऱ्या घंटिका का नादशून्य एकाएकी ?
असें एक शून्याकार विश्व माझें आकारतें,
नाद-ब्रह्मांड अवेळीं असें अस्ताला टेकतें.
वाट पाहून पाहून थवे शब्दांचे निघाले,
एका अमृतकणाला रेखारूपांत देखिलें.
नादब्रह्मांडाच्या सूर्या, जाई अस्ताला खुशाल,
मंद चांदण्याने माझें विश्व भरून राहील.

## उल्कापात

सिमेंटचा एक देखणा शक्तिभार
एकाएकी ढासळला,
पाखरासारखा छिन्नविच्छिन्न होत होत
जमिनीवर कोसळला.
ढळलेल्या वास्तूचे इथे तिथे
असहाय ढिगारे.
त्या ढिगाऱ्यांनी पोटाशीं धरलेली
घरसंसाराची मोडतोड.
त्यांतल्याच एका ढिगांतून टकमकणारी
एक लहानशी अभंग पाटी कोऱ्या चौकटीची.
एका ढिगावर कोंब उगवावा तसा
एक खुळखुळा पत्र्याचा.
कोसळत्या अभद्र वेळीं पाटीवर तिचा
ललाटलेख कोरला गेला असेल,
खुळखुळ्यांत त्या लेखांतील आक्रोश
हवाबंद केला असेल.
तरी पण त्या विध्वंसांतूनही पाटीने
आपलें कोवळें पाटीपण अजून राखून ठेवलेलें,
उल्कापातांतूनही खुळखुळ्याने आपलें
गोड तान्हेपण आकारांत जपून ठेवलेलें....

## सातरंगी काकण कशी

अवकाशावर नितळ पसरलेला आनंदी अस्मानी,
कोवळ्या धारोष्ण उन्हाचा वर पारदर्शी मुलामा;
शीतळ वाऱ्याचे लयदार हेलकावे;
अवतीभवती अंजीरनिळ्या शुभ्र पांढऱ्या मोरांचे थवे
अमोरसमोर....हा मांडलेला खेळ उत्सुक असा.
खूण कशी....एक मोत्यांची सर चमकत आली....गेली.
तितक्यांत खालून रंगीबेरंगी पतंगांचे थवे
नागफणा उभारून मुरडत चढत, ढुशा देत, सरसरत
वर आले. सोबत असंख्य उत्सुक डोळे मोराला
भेटायला आले
आणि
अवघ्या अवकाशाने खेळ मांडला.
मोरपिसारे झगमग पुढेमागे थरकूं लागले,
पतंगांच्या नागनर्तनाने जलद लयींत फेर धरले,
डोळ्यांचे थवे रुमझुम भिरभिरले....
शरदाने चितारलेला रंगरेषांचा हा आनंदकल्लोळ
की धरित्रीने बसवलेलें हें रंगभरें नृत्यनाट्य
की अवघ्या जीवनांतील क्षणाक्षणांचा हा
स्वच्छंद आनंद....
मोत्यांच्या सरीच्या एका थेंबानेच मी मोहरून भरून
आलें. सातरंगी काकण कशी....भांबावून उभी राहिलें.

REFBK-0025965
REFBK-0025965